ePaper
…तर इराणचे पॉवर प्लांट नष्ट करू', शांतता बैठकीपूर्वी ट्रम्प यांचा इशारा

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज™



पान 2 वरुन...
आरटीई प्रवेश प्रक्रियेत गोंधळ

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 20 एप्रिल 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांचा शोध सुरू, मुख्यमंत्र्यांकडून मदतकार्याचे आदेश

# फटाक्याच्या कारखान्यात भीषण स्फोट; १९ ठार, ६ जखमी

**महाईन्यूज । तामिळनाडू**

**फटाके बनवणाऱ्या कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटात तब्बल १९ कामगारांचा तडफडून मृत्यू झाला असून ६ जण गंभीर जखमी झाले आहेत. रविवारी दुपारी विरुधुनगर जिल्ह्यातील कट्टनारपट्टी येथे ही हृदयद्रावक घटना घडली. स्फोट इतका तीव्र होता की कारखान्याच्या अनेक युनिट्सना आग लागून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.**

पोलीस आणि अग्निशामक दलाच्या माहितीनुसार, वानजा फायरक्रॅकर कारखान्याच्या एका युनिटमध्ये अचानक स्फोट झाला आणि त्यानंतर आगीच्या ज्वाळांनी इतर चार युनिट्सनाही कवेत घेतले. मोठ्या आवाजासह झालेल्या स्फोटामुळे परिसर हादरला. काही कामगारांनी प्रसंगावधान राखत बाहेर पडण्यात यश मिळवले; मात्र अनेकांना पळण्याची संधीच मिळाली नाही.

या दुर्घटनेत १९ कामगारांचा जागीच मृत्यू झाला, तर ६ जण जखमी झाले असून त्यांच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. स्फोटावेळी कारखान्यात सुमारे ३० कामगार उपस्थित होते. अग्निशामक दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेत तासाभराच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणली. त्यानंतर ढिगाऱ्याखाली अडकलेल्या कामगारांचा शोध घेण्याचे काम सुरू करण्यात आले.

स्फोटाचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी फटाके तयार करताना झालेल्या निष्काळजीपणामुळे ही दुर्घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. घटनेची सखोल चौकशी करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत.

दरम्यान, तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने मदतकार्य वेगाने राबवण्याच्या आणि जखमींना योग्य उपचार मिळण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच मंत्र्यांना घटनास्थळी पाठवून परिस्थितीचा आढावा घेण्याचे आदेशही दिले आहेत.




## मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी व्यक्त केला शोक

तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी विरुधुनगर जिल्ह्यातील कनारपट्टी येथे घडलेल्या घटनेची दखल घेतली. त्यांनी घटनेत मृत्यू झालेल्या कामगारांबद्दल दुःख व्यक्त केले. मंत्री के.के.एस.आर. रामचंद्रन आणि थंगम थेन्नारासू यांना तातडीने घटनास्थळी जाऊन मदत कार्याला वेग देण्याच्या सूचना दिल्या आहेत, असेही मुख्यमंत्री म्हणाले.


## १९ कामगारांचा मृत्यू, ६ जखमी

पोलीस अधीक्षक श्रीनाथ यांनी सांगितले की, १९ कामगारांचा मृत्यू झाला असून, ६ जखमी झाले आहेत. वानजा फायरक्रॅकर फॅक्टरीमध्ये हा स्फोट झाला. अनेक खोल्याचेही या स्फोटात नुकसान झाले आहे. या खोल्यामध्ये ३० कामगार होते. अग्निशामक दलाच्या जवानांनी तासाभराच्या प्रयत्नानंतर ही आग आटोक्यात आणली. त्यानंतर ढिगाऱ्याखालून मृतदेह बाहेर काढण्याचे काम सुरू करण्यात आले. फटाक्याच्या कारखान्यात हा स्फोट का झाला, याचे कारण अद्याप कळू शकलेले नाही. मात्र, फटाके बनवत असतानाच काही चूक झाल्यामुळे ही घटना घडली असावी, असा प्राथमिक अंदाज आहे. घटनेची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहे. जखमींवर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



# आरटीई प्रवेश प्रक्रियेत गोंधळ; 1.14 लाख जागांपैकी फक्त 26 हजार प्रवेश निश्चित

## मुंबई उच्च न्यायालय कडून खुल्या चौकशीस परवानगी



# एटीएस गोंधळावर अखेर तोडगा; फिटनेस मुदतवाढ

**महाईन्यूज । पुणे**

राज्यातील रिक्षा, टॅक्सी, स्कूलबस आणि टेम्पो चालकांसमोर ‘एटीएस’ (ऑटोमॅटिक टेस्टिंग स्टेशन) प्रणालीमुळे निर्माण झालेला वाहन फिटनेस तपासणीचा गंभीर पेच अखेर सुटला आहे. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पाठपुराव्यामुळे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाने वाहन नूतनीकरण प्रक्रियेला ऑक्टोबर 2026 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. मोहोळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केला होता.

रस्ते सुरक्षा अधिक कडक करण्यासाठी केंद्र सरकारने व्यावसायिक वाहनांच्या फिटनेस तपासणीसाठी एटीएस प्रणाली अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, महाराष्ट्रातील अनेक आरटीओ क्षेत्रांत ही यंत्रणा पूर्णतः सक्षम झालेली नाही. या तांत्रिक बदलामुळे राज्यातील 11 प्रमुख आरटीओ क्षेत्रांतील 15 लाख व्यावसायिक वाहनांचे नूतनीकरण बंद झाले होते. यामुळे रिक्षाचालकांपासून ते मालवाहतूकदारांपर्यंत सर्वांसमोर उदरनिर्वाहाचे संकट उभे राहिले होते.

राज्यातील 11 आरटीओ क्षेत्रांमध्ये एटीएस प्रणाली सक्तीची केल्यामुळे तांत्रिक अडचणी निर्माण होऊन वाहन पासिंग प्रक्रिया ठप्प झाल्याने वाहनधारकांचे मोठे नुकसान होत होते. त्यामुळे केंद्रीय मंत्री मोहोळ यांनी तत्काळ वरिष्ठस्तरावर चर्चा करून ही जाचक अट तूर्तास शिथिल करण्यात यश मिळविले.

**महाईन्यूज । पुणे**

**महापालिकेचे माजी शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांच्याविरोधातील कथित बेहिशेबी मालमत्ता प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून खुली चौकशी रोखण्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केला आहे. त्यानुसार खुली चौकशी करण्यास न्यायालयाने मान्यता दिली आहे.**




राज्यात शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांमधील 25 टक्के राखीव जागांसाठी सुरू असलेल्या प्रवेश प्रक्रियेत नियोजनाचा अभाव असल्यामुळे पालकांना इच्छा असूनही तातडीने त्यांच्या मुलांचे प्रवेश करता येत नाहीत. त्यामुळेच प्रवेशाची मुदत संपायला दोन दिवस शिल्लक असताना केवळ 26 हजारांवरच विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले असल्याचे स्पष्ट झाले आहे.

प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यंदा राज्यातील 8 हजार 701 शाळांमध्ये एकूण 1 लाख 14 हजार 826 जागा उपलब्ध आहेत. या जागांसाठी 2 लाख 89 हजार 286 अर्ज दाखल झाले आहेत. तर, शनिवारी सायंकाळपर्यंत राज्यात 26 हजार 537 विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. ज्या विद्यार्थ्यांची नावे निवड यादीत आहेत, त्यांना प्रवेश निश्चित करण्यासाठी 20 एप्रिलपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. या कालावधीत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून शाळांमध्ये प्रवेश घेणे बंधनकारक आहे. अपेक्षित प्रवेश न झाल्यामुळे प्रवेशासाठी मुदतवाढ दिली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

### तक्रार निवारण केंद्राची गरज

आरटीई प्रवेशप्रक्रियेत चौकशी समिती सक्रिय दिसत नाही. तसेच पालकांना आवश्यक कागदपत्रांबाबत स्पष्ट माहिती दिली जात नाही. विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये वडिलांनाच ग्राह्य धरण्याची पद्धत असून, आईलाही समान पालक म्हणून मान्यता दिली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रवेशप्रक्रियेची पुरेशी माहिती नसते. त्यासाठी आवश्यक मार्गदर्शन, संपर्क क्रमांक किंवा माहिती केंद्र उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. तसेच पालकांना भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी तक्रार निवारण केंद्रांची गरज प्रकर्षाने दिसून येत आहे.

# मार्केट यार्डात ‘आंबा महोत्सवा’बाहेर अनधिकृत विक्रेत्यांचा सुळसुळाट

**महाईन्यूज । पुणे**

**मार्केट यार्डात राज्य कृषी पणन मंडळाच्या आंबा महोत्सव केंद्राबाहेर गेटच्या दुतर्फा रस्त्यावर अनधिकृत किरकोळ विक्रेत्यांचा सुळसुळाट होऊन प्रति आंबा महोत्सवच सुरू झाल्याचे दिसून येत आहे. कर्नाटकातील आंब्यांची कोकण हापूस म्हणून उघडपणे विक्री सुरू आहे. विशेष म्हणजे पणन मंडळाच्या रक्षकाला हे विक्रेते भीकसुद्धा घालत नाहीत.**



परिणामी, ग्राहकांची फसवणूक होत आहे. त्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीकडून अनधिकृत आंबा विक्रेत्यांवर धडक कारवाई करण्याची मागणी महोत्सवात सहभागी शेतकऱ्यांकडून करण्यात आली आहे.

पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते यंदाच्या रौप्यमहोत्सवी आंबा महोत्सवाचे उद्घाटन गेल्याच आठवड्यात झाले. त्या वेळी व्यासपीठावर पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रकाश जगताप व अन्य अधिकारी उपस्थित होते. पणनच्या आंबा महोत्सवाला सर्वतोपरी बाजार समितीचे सहकार्य राहील, असे आश्वासनही जगताप यांनी मंत्र्यांसमोरच दिलेले आहे. शनिवारी या महोत्सवाला भेट दिली असता, गेटबाहेर दुतर्फा अनधिकृत विक्रेत्यांनी उघडपणे आंबा विक्री करून शेतकऱ्यांच्या मालविक्रीस चुकीची व अनधिकृत स्पर्धा निर्माण केलेली आहे.

कोकणातील हापूसच्या नावाखाली सर्रास कर्नाटक आंबा ग्राहकांच्या गळ्यात मारण्याचा प्रकार सुरू आहे. वास्तविक या रस्त्यावर आंबा महोत्सवाबाहेरच अशी विक्री करण्याचे धाडसच कसे होते? मार्केट कमिटीकडून सुरक्षा रक्षकांवर लाखोंचा खर्च केला जात असताना, अनधिकृत विक्रेते हटविण्याबाबत कारवाईची मागणी शेतकऱ्यांनी केली. याबाबत प्रशासनाचे प्रमुख असलेले बाजार समितीचे सचिव व सहकारचे उपनिबंधक राजाराम धोंडकर यांना संपर्क साधला असता ते उपलब्ध होऊ शकले नाहीत.

> पणन मंडळाच्या आंबा महोत्सवाला पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे नेहमीच सहकार्य लाभले असून, ते यापुढेही कायम राहील. शेवटी उत्पादक शेतकरी स्वतः आंबा विक्री करीत असून, खात्रीशीर माल पुणेकर ग्राहकांना उपलब्ध होत आहे. त्यामुळे पणनमंत्री जयकुमार रावल यांनीही पणन मंडळाच्या या उपक्रमाचे कौतुक केले आहे. हा महोत्सव सुरळीत चालण्यासाठी वखार महामंडळ रस्त्यावर होणाऱ्या अनधिकृत शेतमाल विक्रीबाबत पुढील दोन दिवसांत कडक कारवाई करण्याच्या सूचना प्रशासनाला देत आहे.
>
> **- प्रकाश जगताप, सभापती, पुणे कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे**

# पिंपरीत आमदार स्टिकर लावून गाड्यांचा धिंगाणा

## खोट्या ‘विधानसभा सदस्य’ स्टिकरचा वाढता गैरवापर; आरटीओ नियमांना पायदळी तुडवले

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**काळी काच, त्यावर गोलाकृत राज्याच्या विधानसभेचे स्टिकर त्यामध्ये अशोक स्तंभ, स्टाईलमध्ये लावलेली नंबर प्लेट जणूकाही आमदारांचे वाहन असल्याचे भासवण्याचा प्रयास शहरातील बहुतांश वाहनचालक, आजी-माजी नगरसेवक, कार्यकर्ते करताना दिसून येत आहेत. विधानसभा सदस्याचा स्टीकर लावून पिंपरी शहर, उपनगरात रुबाब, दाखवण्यासाठी आरटीओचे नियम मोडीत काढून गाड्या फिरवत असल्याचे दिसून येत आहेत; परंतु याकडे वाहतूक पोलिस दुर्लक्ष करत असल्याने अशा वाहनचालकांचा सुळसुळाट शहरात वाढला आहे.**




> काळी काच, स्टाईलमध्ये नंबर प्लेट बसवलेले चारचाकी वाहने सर्रासपणे शहरात नियम धाब्यावर बसवून फिरत असताना आढळून आल्यास आमच्या स्कॉडकडून अशा वाहनांवर कारवाई केले जाते. तरी असे वाहने रस्त्यावर सुसाट वेगाने धावताना आढळून आल्यास त्यांच्यावर योग्य कारवाई केली जाईल. अशा सूचना आमच्या स्कॉडला दिलेल्या आहेत. तरी येत्या काही दिवसांत अशा वाहनांवर लवकरच कारवाई करण्यात येईल. - आनंद मेश्राम, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी-चिंचवड

मागील काही दिवसांपासून वाहतुकीचे सर्व नियमांना तिलांजली देत काही चारचाकी वाहने वाहतूक पोलिसांच्या नजरा चुकवत रुबाबात फिरत असताना दिसतात. चारचाकी वाहनावर एक गोलाकार स्टिकर, त्यावर महाराष्ट्र विधानसभा सदस्य असे लिहिलेले आमदारांचे वाहन नसताना विधानसभा सदस्याचा स्टिकर लावून पिंपरी शहर, उपनगरांत रुबाबात वाहन चालवणाऱ्यांची संख्या वाढत आहे.

गाडीत आमदार असल्यासारखा रुबाब त्या गाडीचा असतो. उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या नियमांचे पालन त्या वाहनचालकांडून होत नाही. ही वाहने पिंपरी शहरांतील विविध ठिकाणी सतत फिरताना दिसतात. गाडीत खरंच आमदारसाहेब आहेत की नाही, हे पोलिसांना पडलेली भूरळ असते.

परंतु पिंपरी शहरातील परिसरात मात्र त्या गाडीची चर्चा होती तरी या स्टिकरमुळे आरटीओच्या नियमांचे पालन केले जात नाही.

### स्टिकर लावून फिरणाऱ्या वाहनांवर कारवाई कधी?

मागील काही दिवसांपासून पिंपरी शहर, उपनगरात खराळवाडी, पिंपरी, चिंचवड, नेहरूनगर, संत तुकारामनगर, वल्लभनगर, मासुळकर कॉलनी, अजमेरा वास्तूउद्योग, पिंपरीगाव, डिलक्स चौक, शगुन चौक या परिसरामध्ये वाहतुकीचे सर्व नियम मोडून काही चारचाकी वाहनांवर विधानसभा सदस्याचा खोटा स्टीकर लावून गाडी फिरत आहे. या वाहनावर एक गोलाकार स्टिकर यावर महाराष्ट्र विधानसभा सदस्य आमदार आणि मध्यभागी अशोक स्तंभ असे हिरव्या रंगाचे स्टिकर गाडीच्या समोरील बाजूस चिटकवलेले दिसून येते . पोलिसांना संशय आल्यानंतर अशा वाहनांचा पाठलाग देखील केला जातो; परंतु ती वाहने मिळून येत नाहीत. त्यामुळे वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनांवर कारवाईची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

---

# पिंपरीत थरारक घटना; प्रियकरासोबत आईकडून सहा वर्षीय मुलाची हत्या

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**प्रेमसंबंधात अडसर ठरणाऱ्या पोटच्या सहा वर्षीय मुलाला आईने तिच्या प्रियकरासोबत कट रचून ठार केले. या गुन्ह्यात आरोपी असलेला फरार प्रियकर राम विनायक कजेवाडी (रा. कुरुळी, ता. खेड, मूळ रा. पूस, ता. अंबाजोगाई, जि. बीड) याला दक्षिण महाळुंगे पोलिसांनी आंध प्रदेश आणि अंबाजोगाई येथे पाठलाग करून शुक्रवार (दि. 17) अटक केली आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आई आणि तिच्या प्रियकराने संगनमत करून शनिवारी (दि. 4) रात्री साडेअकराच्या सुमारास चाकण औद्योगिक वसाहतीतील कुरुळी (ता. खेड) येथे सहा वर्षांच्या बालकाची निर्घृण हत्या केली होती. मुलाचा खून केल्यानंतर त्याचा मृत्यू हृदयविकाराच्या धक्क्याने झाला असल्याचा बनाव करण्यात आला होता.

आवेज मेहबूब शेख (वय 6) असे खून झालेल्या मुलाचे नाव आहे. या प्रकरणात इसाक शेख (49, मूळ रा. अंबाजोगाई, जि. बीड) यांनी फिर्याद दिली होती. पोलिसांनी बसरिन मेहबूब शेख (27, रा. मु. पो. पूस, ता. अंबाजोगाई, बीड) हिला अटक केली असून, तिचा प्रियकर राम विनायक कजेवाड (रा. कुरुळी, ता. खेड, मूळ रा. पुस, ता. अंबाजोगाई, जि. बीड) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता.




त्यानंतर तो फरार होता.

बसरिन शेख आणि राम कजेवाड यांचे प्रेमसंबंध होते. त्यांच्या प्रेमसंबंधात सहा वर्षीय आवेज हा अडथळा ठरत होता. त्यामुळे दोघांनी शनिवारी रात्री त्याला बाथरूममध्ये नेले. त्याचे डोके बादलीतील पाण्यात बुडवून ठार केले. त्यानंतर मृतदेह धर्मापुरी (ता. परळी, जि. बीड) येथे नेऊन त्याचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचा बनाव केला; मात्र, यामध्ये नातेवाईकांना संशय आला. नातेवाईकांनी बीड जिल्ह्यातील परळी ग्रामीण पोलिस ठाण्यात माहिती दिली. पोलिसांनी मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यास सांगितले. शवविच्छेदन अहवालात धक्कादायक माहिती समोर आली. आवेज याचा मृत्यू हृदयाच्या धक्क्याने झाला नसून पाण्यात बुडवून झाल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे पोलिसांनी आवेजच्या आईला ताब्यात घेतले. तिच्याकडे विचारपूस केली असता तिने तिच्या प्रियकरासोबत मिळून हा गुन्हा केल्याचे कबूल केले. पुढे परळी ग्रामीण पोलिसांनी हा गुन्हा पिंपरी चिंचवड पोलिसांच्या ताब्यात दिला. दक्षिण महाळुंगे पोलिसांनी बुधवार गुन्ह्याची नोंद केली. त्यानुसार, फरार आरोपीचा तपास घेत असताना तिरुपती आंध प्रदेश आणि बीड या ठिकाणी त्याचा पाठलाग करून आरोपीस अटक केली. न्यायालयाने आरोपीला पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

### निर्घृण कटाचा शेवट अटकेत

प्रेमसंबंधात अडसर ठरल्याने आईने प्रियकरासोबत संगनमत करून सहा वर्षीय मुलाची बाथरूममध्ये पाण्यात बुडवून हत्या केली. मृत्यू हृदयविकाराने झाल्याचा बनाव उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी आईला अटक केली, तर फरार प्रियकराला आंध्र प्रदेश व बीड येथे पाठलाग करून ताब्यात घेतले.



## भूमिका

**पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर अनिश्चिततेचे ढग दाटले असताना, यंदाच्या पावसाळ्याबाबत व्यक्त होत असलेला कमी पावसाचा अंदाज ही आणखी एक गंभीर चिंता बनली आहे. युद्धामुळे तेलाच्या किमतीत होणारी चढ-उतार, आयात-निर्यातीतील अडथळे आणि वाढती महागाई यामुळे आधीच आर्थिक ताण वाढलेला आहे.**

# दुष्काळाच्या सावटाखालील पावसाळा

त्यातच पावसाच्या कमतरतेची शक्यता निर्माण झाल्याने शेती, पाणीपुरवठा आणि सर्वसामान्यांच्या जगण्यावर मोठा परिणाम होण्याची चिन्हे आहेत.

भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, यंदा देशात सरासरीच्या सुमारे ९२ टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे. हे प्रमाण साधारण वाटले तरी प्रत्यक्षात ते कमी पावसाचे संकेत देणारे आहे. 'एल निनो'चा वाढता प्रभाव आणि 'ला निना'ची घटती स्थिती ही मान्सूनसाठी प्रतिकूल मानली जाते. खासगी हवामान संस्था 'स्कायमेट'नेही अशाच प्रकारचा अंदाज व्यक्त केला आहे. गेल्या तीन दशकांतील हा सर्वांत कमी अंदाज असल्याने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक ठरते.



कमी पावसाचा सर्वाधिक परिणाम पाणी साठ्यावर होतो. महाराष्ट्रासारख्या राज्यात धरणांवरच शेती आणि पिण्याच्या पाण्याचा मोठा आधार आहे. साठा कमी झाला, तर प्रथम पिण्याच्या पाण्यास प्राधान्य दिले जाते आणि त्यामुळे शेतीसाठी पाण्याची टंचाई निर्माण होते. उसासारख्या पाण्यावर अवलंबून असलेल्या नगदी पिकांना याचा मोठा फटका बसू शकतो. परिणामी कृषी अर्थव्यवस्था डळमळीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शहरी भागातही परिस्थिती फार वेगळी नाही. पुणे, मुंबई, ठाणे यांसारख्या महानगरांमध्ये आधीच अनेक भाग टँकरवर अवलंबून आहेत. पाणी वितरण व्यवस्थेतील त्रुटी आणि वाढती लोकसंख्या यामुळे प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. जर पावसाचा साठाच कमी राहिला, तर टँकरवरील अवलंबित्व आणखी वाढेल आणि त्यातून नफेखोरीचे प्रकारही वाढण्याची शक्यता आहे. याचा सर्वाधिक फटका सर्वसामान्य नागरिकांना बसतो.

अशा संभाव्य संकटाच्या पार्श्वभूमीवर शासन आणि प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. पाण्याचे नियोजन, जलसंधारण प्रकल्प, पिकपद्धतीत बदल आणि खतांच्या पुरवठ्याचे नियोजन या गोष्टींवर आतापासूनच भर दिला पाहिजे. विशेषतः पश्चिम आशियातील युद्धामुळे खतांच्या पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता असल्याने कृषी क्षेत्रासाठी आधीच तयारी करणे गरजेचे आहे.

पर्यावरण आणि हवामान यांसारख्या विषयांकडे सहसा राजकीय प्राधान्याने पाहिले जात नाही, हे वास्तव आहे. मात्र, अशा संकटांवर मात करण्यासाठी दीर्घकालीन दृष्टीकोन आवश्यक असतो. वृक्षारोपण, जलसंधारण आणि शाश्वत विकास यांसारख्या उपाययोजना तात्काळ परिणाम देत नसल्या तरी भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात.

दुष्काळाची चाहूल लागत असतानाच तयारी सुरू करणे हेच शहाणपणाचे लक्षण आहे. अन्यथा, संकट ओढविल्यानंतर केवळ उपाययोजना करून परिस्थिती सुसह्य करणे कठीण ठरते. म्हणूनच, आजच पाणी आणि शेती व्यवस्थापनाबाबत ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. अन्यथा, दुष्काळाचा फटका सर्वसामान्यांच्या जीवनावर गंभीर परिणाम करणारा ठरू शकतो.

## प्रासंगिक »

### अतिथी धर्म

**शिवराज एका चोराचा पाठलाग करत होता. गावाच्या बोलबोळांतून पळणारा चोर अखेर शिवराजच्या नजरे आड झाला. तो चोर एका घरात घुसला होता.**

त्या घरातील माणसाने त्या गावच्या रिवाजाप्रमाणे अतिथी धर्म पाळला. त्या घरात घुसलेल्या चोराला आतल्या खोलीत लपविले. इतक्यात पाठलाग करणारा शिवराज तिथे आला. त्याने पळणाऱ्या व्यतीचे म्हणजे चोराचे वर्णन करून 'असा मनुष्य इथे आला होता का? त्याला आपण पाहिलेत का' असे विचारले. गावच्या रिवाजाप्रमाणे अतिथी धर्म पाळण्याकरिता तो कुटुंबप्रमुख खोटे बोलला व असा माणूस पाहिला नसल्याचे सांगितले. पण, त्या गृहस्थाच्या मुलाने मात्र शिवराजकडे पाहून आतल्या खोलीकडे खून केली. शिवराज काय ते समजला आणि त्याने आतल्या खोलीत घुसून त्या चोराला पकडले व तो त्या चोराला घेऊन गेला. त्या गृहस्थाला मुलाचा राग आला. कारण, त्याच्या मुलाने गावच्या रिवाजाप्रमाणे अतिथी धर्म पाळला नव्हता. त्या कथेपुरते त्या मुलाचे म्हणजे बरोबर होते.

- तात्पर्य : सत्याचा अर्थ, महत्व परिस्थितीनुसार बदलत असते.

**कामाच्या ठिकाणी स्त्रियांच्या सुरक्षिततेबाबतचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मुंबई उच्च न्यायालय यांनी नुकत्याच दिलेल्या निर्णयात सहकारी महिलेच्या शरीराकडे एकटक पाहणे हे गैरकृत्य असले तरी ते गुन्हा ठरत नाही, असे स्पष्ट केले. कायद्याच्या दृष्टीने हा निर्णय योग्य असू शकतो, मात्र समाजाच्या आणि विशेषतः स्त्रियांच्या अनुभवाच्या दृष्टीने तो अनेक प्रश्न निर्माण करणारा आहे.**

# ऑफिसात तसले स्पर्श... रोखायचं कोणी, कसं?



कायद्यात 'गुन्हा' आणि 'गैरवर्तन' यामध्ये स्पष्ट भेद केला जातो. परंतु स्त्रीच्या सन्मानाच्या दृष्टीने हा भेद अनेकदा गौण ठरतो. एखाद्या कृत्यामुळे स्त्रीला होणारी अस्वस्थता, भीती किंवा अपमानाची भावना ही तितकीच गंभीर असते, मग ते कृत्य कायदेशीरदृष्ट्या गुन्हा ठरो अथवा न ठरो. त्यामुळे अशा प्रकारच्या वर्तनाकडे 'किरकोळ' म्हणून पाहणे धोकादायक ठरू शकते.

याच पार्श्वभूमीवर कामाच्या ठिकाणी स्त्रियांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) कायदा २०१३ अस्तित्वात आहे. या कायद्याने प्रत्येक संस्थेला अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे, जागरूकता निर्माण करणे आणि तक्रारींचे निवारण करणे बंधनकारक केले आहे. मात्र प्रत्यक्षात या कायद्याची अंमलबजावणी अनेक ठिकाणी केवळ औपचारिकतेपुरती मर्यादित राहिल्याचे दिसते. मोठ्या कंपन्यांमध्येही प्रशिक्षण सत्रे उरकली जातात, समित्यांवर तज्ज्ञांची कमतरता असते आणि तक्रारी गांभीर्याने घेतल्या जात नाहीत.

कॉर्पोरेट क्षेत्रात आधुनिकता, मोकळेपणा आणि समानतेचे चित्र रंगवले जात असले तरी वास्तव वेगळे आहे. अनेक स्त्रिया अजूनही असुरक्षिततेचा सामना करत आहेत. सामाजिक दबाव, नोकरी गमावण्याची भीती किंवा 'काय फरक पडणार' ही मानसिकता यामुळे त्या अनेकदा आवाज उठवत नाहीत. परिणामी, गैरवर्तनाला मूक संमती मिळाल्यासारखी परिस्थिती निर्माण होते. यासाठी केवळ कायदे पुरेसे नाहीत, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि मानसिकतेत बदल आवश्यक आहे. शासनाने अधिक कठोरपणे नियमांची अंमलबजावणी करणे, संस्थांनी संवेदनशीलतेने वागणे आणि स्त्रियांनीही निर्भीडपणे पुढे येणे ही तितकीच गरजेची पावले आहेत. कार्यस्थळ हे केवळ उपजीविकेचे साधन नसून सन्मानाने जगण्याचा अधिकार देणारी जागा आहे.

त्यामुळे कोणतेही गैरवर्तन, ते गुन्ह्याच्या चौकटीत बसो वा न बसो, रोखणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. अन्यथा, सुरक्षिततेचा हा प्रश्न केवळ कायद्यापुरता मर्यादित राहील आणि प्रत्यक्ष आयुष्यात बदल घडणार नाही.

## ।। अभंगवाणी ।।



विठो माउलिये हा चि वर देईं ।
संचरोनि राहीं हृदयामाजी ॥१॥

तुका म्हणे कांहीं न मागे आणीक ।
तुझे पायीं सुख सर्व आहे ॥धृ॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मुंबई-अहमदाबाद महामार्गावर दीड तास वाहतूक ठप्प

## ज्वलनशील रसायन वाहणाऱ्या टँकरला अपघात; 5 किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा

**महाईन्यूज । पालघर**

**मुंबई-अहमदाबाद महामार्गावर पालघर तालुक्यातील ढेकाळे गावाच्या हद्दीतील वाघोबा खिंड परिसरात शनिवारी सकाळी ज्वलनशील रसायन वाहून नेणाऱ्या टँकरचा अपघात झाल्यानंतर रसायनाची गळती सुरु झाल्याने मोठी खळबळ उडाली.**



अपघातग्रस्त टँकर सुरक्षितपणे हटवण्यासाठी महामार्गाच्या दोन्ही वाहिन्यांवरील वाहतूक तब्बल दीड तास रोखण्यात आली होती. त्यामुळे दोन्ही वाहिन्यांवर सुमारे पाच किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. मिळालेल्या माहितीनुसार,शनिवारी सकाळी वाघोबा खिंड परिसरात ब्युटाईल ॲक्रीलेट नामक रसायनाची वाहतूक करणाऱ्या टँकर चालकाचे नियंत्रण सुटल्याने टँकर पलटी झाला होता.अपघातानंतर टँकरमधील ज्वलनशील रसायनाची गळती सुरु झाल्याने धोका निर्माण झाला होता.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून महामार्ग सुरक्षा विभागाने तातडीने अग्निशमन दल, जिल्हा वाहतूक पोलीस, महामार्ग सुरक्षा पथक तसेच रसायन हाताळण्यात तज्ज्ञ असलेल्या कामगारांना घटनास्थळी पाचारण केले.सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्ह्यातील वरिष्ठ पोलीस अधिकारीही घटनास्थळी उपस्थित होते.

महामार्गावरील वाहतूक रोखल्यानंतर अपघातग्रस्त टँकर काळजीपूर्वक महामार्गावरून हटवण्यात आला.सुमारे दीड तासांच्या प्रयत्नांनंतर टँकर हटवण्यात यश आले.महामार्गावरील दोन्ही बाजूंची वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आल्याने वाहनचालक आणि प्रवाशांची गैरसोय झाली.

महामार्गावरून टँकर हटवल्यानंतर वाहतूक पुन्हा सुरळीत करण्यात आली. ज्वलनशील रसायनाची वाहतूक करणाऱ्या टँकरच्या अपघातामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. टँकर हटवण्याच्या कामात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या रुग्णवाहिका, क्रेन, अग्निशमन दल,आपत्ती व्यवस्थापन अधिकारी आणि केमिकल एक्सपर्टची मदत घेण्यात आली. अपघातस्थळी जिल्हाधिकारी डॉ इंदूराणी जाखड, पोलीस अधीक्षक यतिश देशमुख ठाणे परिक्षेत्राचे महामार्ग पोलीस अधीक्षकांनी यांनी भेट देऊन मार्गदर्शन केले.

### रसायन गळतीने निर्माण झाला धोका

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर ज्वलनशील रसायन वाहून नेणारा टँकर पलटी होऊन गळती सुरू झाल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले. सुरक्षिततेसाठी दीड तास वाहतूक रोखण्यात आली, तर अग्निशमन दल व तज्ज्ञांच्या मदतीने टँकर हटवून परिस्थिती नियंत्रणात आणली.

# अक्षय तृतीयेस सोन्याला झळाळी; सराफा बाजारात खरेदीचा उत्साह शिगेला

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहरातील सराफा बाजारास अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर झळाळी मिळत असून, महागाई व सोन्याच्या वाढत्या दरांनंतरही ग्राहकांचा उत्साह ओसंडून वाहत आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी अत्यंत शुभ मानल्या जाणाऱ्या या दिवशी सोने खरेदी केल्यास समृद्धी आणि वैभव वाढते, अशी धारणा असल्याने बाजारात खरेदी आणि बुकींगचा जोर वाढला आहे. अक्षय तृतीया रविवारी असून, दसऱ्यापेक्षाही आता सोने खरेदीला अधिक प्रतिसाद मिळत असल्याचे सराफा व्यावसायिकांनी सांगितले.**



सध्या २४ कॅरेट सोन्याचा दर सुमारे १ लाख ५२ हजार ५०० रुपये, तर २२ कॅरेट सोन्याचा दर १ लाख ४२ हजार रुपयांवर पोहोचला आहे. यावर तीन टक्के जीएसटी आणि ७ ते १२ टक्क्यांपर्यंत मजुरी आकारली जात असली तरी ग्राहकांच्या खरेदीवर त्याचा फारसा परिणाम दिसत नाही.

### हलक्या वजनाच्या दागिन्यांची 'क्रेझ'

बाजारात सध्या हलक्या वजनाच्या दागिन्यांची विशेष 'क्रेझ' दिसत आहे. वाढत्या दरामुळे सराफा व्यावसायिकांनीही ग्राहकांच्या खिशाला परवडणारे पर्याय उपलब्ध करून देत नव्या 'ट्रेंड'ला चालना दिली आहे. दरम्यान, ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी अनेक ज्वेलर्सनी ४० ते ५० टक्क्यांपर्यंत सूट जाहीर केली आहे.

> अक्षय तृतीयेनिमित्त सोन्याच्या दागिन्यांची बुकींग जोरात आहे. दरवर्षी या सणाला सोने खरेदी मोठ्या प्रमाणावर केली जाते. दसरा सणापेक्षाही अक्षय तृतीयेला सोने खरेदीसाठी चांगला प्रतिसाद मिळतो.
>
> **- सराफ दुकानदार**



# १७ लाख कर्मचारी संपावर; शासनाविरोधात एल्गार...

**महाईन्यूज । पाली**

राज्यातील सरकारी, निमसरकारी तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ सोमवार (ता. 21) पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या १५ महिन्यांपासून विविध आंदोलनांच्या माध्यमातून मागण्या मांडूनही शासनाकडून केवळ आश्वासने मिळत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. रायगड जिल्ह्यातील सर्व कर्मचारी व शिक्षक या संपात सक्रियपणे सहभागी होणार असल्याची माहिती समन्वय समितीने दिली.

कर्मचारी संघटनांनी एकूण १८ मागण्या मांडल्या असून त्यामध्ये सुधारित निवृत्ती वेतन योजनेबाबत स्पष्ट नियम, १ मार्च २०२४ पासून निवृत्त झालेल्यांना तात्पुरते वेतन, निवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, पदोन्नती व लाभ, सेवांतर्गत प्रगती योजना (१०:२०:३०), रिक्त ३५ टक्के पदे भरणे, चतुर्थश्रेणी व वाहन चालक भरतीवरील बंदी उठवणे, कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करणे तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण या प्रमुख मागण्या आहेत.

राज्यातील तब्बल १७ लाख कर्मचारी संपावर गेल्यास प्रशासनावर मोठा ताण येण्याची शक्यता असून शासकीय कामकाज विस्कळीत होण्याची चिन्हे आहेत. शासन तातडीने तोडगा काढते की परिस्थिती आणखी चिघळते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महिला आरक्षण वाद पेटला; ममतांचा मोदींवर हल्ला

## देशाची दिशाभूल; "संघराज्यीय रचनेवर आघात सहन करणार नाही" असा इशारा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**संसदेत महिला आरक्षण विधेयक नामंजूर झाल्यानंतर देशातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधी पक्षांवर टीका केल्यानंतर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी तीव्र प्रतिक्रिया देत केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे.**

मुख्यमंत्र्यांनी ‘एक्स’वरील पोस्टमधून पंतप्रधानांवर आरोप करत म्हटले की, महिला आरक्षणाचा प्रश्न प्रामाणिकपणे सोडवण्याऐवजी देशाची दिशाभूल करण्याचा मार्ग स्वीकारण्यात आला आहे, जे अत्यंत दुर्दैवी आहे. त्यांनी स्पष्ट केले की, त्यांच्या पक्षाने नेहमीच महिलांच्या राजकीय प्रतिनिधित्वाला पाठिंबा दिला आहे आणि त्यांच्या पक्षात महिला प्रतिनिधींचे प्रमाण लक्षणीय आहे. त्यामुळे महिला आरक्षणाला विरोध करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी परिसीमन प्रक्रियेवरही आक्षेप घेतला. केंद्र सरकार आपले राजकीय हित साधण्यासाठी महिलांना पुढे करत असल्याचा आरोप करत, राज्यांच्या प्रतिनिधित्वात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी म्हटले. हा प्रकार संघराज्यीय लोकशाहीवर हल्ला असल्याचे सांगत अशा निर्णयांना तीव्र विरोध केला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

तसेच, महिला आरक्षण विधेयक सप्टेंबर २०२३ मध्ये मंजूर होऊनही त्याची अंमलबजावणी दीर्घकाळ का लांबवण्यात आली, आणि निवडणुकांच्या तोंडावरच त्याबाबत घाई का केली जात आहे, असे सवालही त्यांनी उपस्थित केले. विधेयकाला मतदारसंघ पुनर्रचनेशी जोडण्यामागील हेतू काय, यावरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

दरम्यान, महिला आरक्षणाच्या मुद्द्यावरून केंद्र आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरूच असून, या वादामुळे आगामी राजकीय समीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



### विधेयक मंजूर होऊनही ३ वर्षे विलंब का?

सप्टेंबर २०२३ मध्ये विधेयक मंजूर झाले असले तरी त्याची अंमलबजावणी लगेच न करता ती पुढील जनगणना आणि परिसीमन प्रक्रियेशी जोडण्यात आली आहे. सरकारचे म्हणणे आहे की, नव्या मतदारसंघ रचनेनंतरच आरक्षण प्रभावीपणे लागू करता येईल. मात्र, विरोधकांच्या मते हा विलंब जाणीवपूर्वक केला जात असून महिलांना तात्काळ प्रतिनिधित्व मिळण्यापासून रोखले जात आहे. त्यामुळे विधेयक मंजूर होऊनही प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी किमान ३ वर्षांचा कालावधी लागणार आहे.

### हा हल्ला लोकशाहीवरील

ममता बॅनर्जी यांनी परिसीमन प्रक्रियेवरही तीव्र आक्षेप घेतला. मोदी सरकार आपले हितसंबंध साधण्यासाठी महिलांना ढाल म्हणून पुढे करत आहे. आम्ही बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानातील बदलांना, देशाच्या विभाजनाला आणि इतर राज्यांच्या किंतीवर भाजपशासित राज्यांना अधिक प्रतिनिधित्व देण्यासाठी राजकीय सीमांच्या फेररचनेला तीव्र विरोध करत आहोत. हा संघराज्यीय लोकशाहीवरील हल्ला आहे आणि आम्ही हे सहन करणार नाही, असे ममता बॅनर्जी यांनी म्हटले आहे.



# श्रीनगर विमानतळावर दोन अमेरिकी नागरिक ताब्यात

**महाईन्यूज । श्रीनगर**

जम्मू-काश्मीरमधील श्रीनगर विमानतळावर सुरक्षा तपासणीदरम्यान दोन अमेरिकी नागरिकांच्या बॅगेतून सॅटेलाइट फोन आढळून आल्याने खळबळ उडाली. या प्रकरणी सुरक्षा अधिकाऱ्यांनी तात्काळ दोघांना ताब्यात घेऊन पुढील चौकशीसाठी पोलिसांच्या हवाली केले आहे.

ताब्यात घेतलेल्या नागरिकांपैकी एकाची ओळख जेफ्री स्कॉट अशी पटली असून तो अमेरिकेतील मोंटाना राज्याचा रहिवासी आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, त्याच्या बॅगेतून सॅटेलाइट फोन जप्त करण्यात आला आहे. भारतात सॅटेलाइट फोनचा वापर करण्यासाठी दूरसंचार विभागाची पूर्वपरवानगी आवश्यक असून, परवानगीशिवाय अशा उपकरणांचा वापर कायद्याने प्रतिबंधित आहे.

प्राथमिक चौकशीत संबंधित नागरिकांनी हे फोन आपत्कालीन संवादासाठी वापरत असल्याचे सांगितले आहे. मात्र, भारतातील नियमांची माहिती नसल्याचा त्यांचा दावा आहे. तरीही हा प्रकार संवेदनशील मानला जात असून सुरक्षा यंत्रणांकडून सखोल तपास सुरू आहे.दरम्यान, याआधीही देशातील विविध विमानतळांवर परदेशी प्रवाशांकडून सॅटेलाइट फोन आढळण्याच्या घटना घडल्या आहेत. गेल्या वर्षी पुदुचेरी येथे एका अमेरिकी नागरिकाकडून तसेच त्याआधी चिनी आणि ब्रिटिश नागरिकांकडूनही असे फोन जप्त करण्यात आले होते.

# राम मंदिर, संसदेवर हल्ल्याचा कट?


**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**ठाणे, मुंबई, ओडिशा आणि बिहार येथील चार कट्टरपंथी तरुणांना दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने अटक केली. देशातील दहशतवादी विचारसरणी आणि दहशतवादी कारवायांच्या नियोजनात त्यांच्या कथित सहभागाबद्दल ही कारवाई करण्यात आली. त्यांचे लक्ष्य राम मंदिर, संसद, लष्करी तळ, लाल किल्ला आणि इंडिया गेट यासारखी ठिकाणे होती, अशी माहिती समोर आली आहे.**

पोलिसांनी सांगितले की, आरोपींपैकी एकाने संभाव्य लक्ष्य म्हणून डिसेंबर 2025 मध्ये लाल किल्ला आणि इंडिया गेटची टेहळणी केली होती. एसीपी आशिष कुमार यांच्या नेतृत्वातील नवी दिल्ली रेंजच्या (एनडीआर) पथकाने अलीकडेच ही कारवाई केल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपींची ओळख पटली असून, त्यात ठाण्यातील वेल्डर मोसाईब अहमद ऊर्फ सोनू ऊर्फ कलाम, मुंबईत बारावीचे शिक्षण घेत असलेला मोहम्मद हम्माद, भुवनेश्वर येथील सुरक्षा रक्षक शेख इम्रान आणि कटिहार येथील प्लम्बर मोहम्मद सोहेल यांचा समावेश आहे.

पोलिस उपायुक्त (विशेष कक्ष) प्रवीणकुमार त्रिपाठी यांनी सांगितले की, आरोपी खिलाफत स्थापन करण्यावर केंद्रित असलेल्या विचारसरणीने प्रभावित होते आणि ‘खुरासानमधून लष्कर’ नावाच्या संघटनेच्या उदयावर त्यांचा विश्वास होता. ते कथितरीत्या या गटात सामील होण्याची आणि





‘गझवा-ए-हिंद’मध्ये सहभागी होण्याची तयारी करत होते. तसेच, इतरांना कट्टरपंथी बनवून त्यांची भरती करण्याचा प्रयत्न करत होते. या कारवाईदरम्यान, पोलिसांनी स्फोटक उपकरणासाठी (आयईडी) लागणारे साहित्य जप्त केले आणि न्यायवैद्यक तपासणीसाठी अनेक मोबाईल उपकरणे ताब्यात घेतली, असे त्रिपाठी म्हणाले.

आरोपी एन्क्रिप्टेड सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील ग्रुपचे सदस्य होते. त्यावर कट्टरतावादी मजकूर शेअर केला जात होता. जिहाद व इस्लामिक राज्य स्थापन करण्यासंदर्भात चर्चा होत होती. मुख्य आरोपींपैकी एक असलेल्या शेख इम्राने यात मध्यवर्ती भूमिका बजावली असल्याचे मानले जाते. त्याने संभाव्य लक्ष्यांवर चर्चा केली. यात राम मंदिर, संसद, लष्करी तळ, लाल किल्ला आणि इंडिया गेट यासारख्या संवेदनशील ठिकाणांचा समावेश होता. त्याने डिसेंबर 2025 मध्ये रेकीसाठी दिल्लीला भेट दिली होती. सदस्यांसाठी शस्त्रे आणि शारीरिक प्रशिक्षणाची व्यवस्था करण्याचे आश्वासनही दिले होते.



# साध्वी सतीश सैल

## 'मिस इंडिया वर्ल्ड २०२६' विजेती

शनिवारी ओडिसा येथे झालेल्या ६१ व्या 'फेमिना मिस इंडिया २०२६' च्या ग्रँड फिनालेमध्ये साध्वी सतीश सैल ही 'मिस इंडिया वर्ल्ड २०२६'ची विजेती ठरली. तिला महाराष्ट्राच्या राजनंदिनी पवार हिने अंतिम फेरीत चांगली टक्कर दिली. परंतु, राजनंदिनी स्पर्धेत फर्स्ट रनर-अप ठरली. तर जम्मू काश्मीरची श्री अद्वैता हिला सेकंड रनर-अपचा किताब मिळाला. यावर्षी निकिता पोरवाल हिने साध्वीला मुकुट घातला. गोवामध्ये राहणारी साध्वी सतीश सैल ही मॉडेल आणि उद्योजिका आहे. तिने अनेक फॅशन शोमध्ये रॅम्प वॉक केला आहे. तसेच CALIFORNIA BURRITO सारख्या ब्रँडचा चेहराही ती राहिली आहे. याशिवाय, तिने बांधकाम आणि विकास क्षेत्रातील एका कंपनीची सह-स्थापना केली आहे. आपल्या विजयानंतर आनंद व्यक्त करत साध्वीने ही संधी मिळाल्याबद्दल आभार मानले. एएनआयशी बोलताना ती म्हणाली, "हा क्षण अजूनही खरा वाटत नाहीये. मला ही संधी मिळाली यासाठी मी खूप आभारी आहे." ती पुढे म्हणाली की, सर्व स्पर्धकांमध्ये चांगलं नातं निर्माण झालं होतं आणि स्पर्धेदरम्यान त्यांनी खूप छान वेळ घालवला. साध्वी सतीश सैल हिने तिच्या सहस्पर्धकांनाही विजेतं म्हटलं आहे. ती म्हणाली की, हा प्रवास एकत्र पुढे जाण्याचा आणि मैत्री निर्माण करण्याचा होता. साधवी म्हणाली, "माझ्यासाठी आज माझ्या सगळ्या मैत्रिणी विजेत्या आहेत. आम्हा सर्वांना भारताचं नाव जगभर मोठं करायचं आहे." याशिवाय, आंतरराष्ट्रीय मंचावर भारताचं प्रतिनिधित्व करण्याबाबत साधवीने उत्साहाबरोबर जबाबदारीची जाणीवही व्यक्त केली. ती म्हणाली की, प्रामाणिकपणा आणि सत्याच्या मार्गाने हा प्रवास पुढे न्यायचा आहे आणि देशाचं नाव उज्ज्वल करायचं आहे. आता पुढे खूप मोठा प्रवास बाकी आहे. ही तर फक्त सुरुवात आहे." तसेच तिने देशवासीयांकडून आशीर्वाद आणि पाठिंब्याचीही विनंती केली. दरम्यान, 'मिस इंडिया वर्ल्ड २०२६'च्या अंतिम फेरीत तीन स्पर्धक होत्या. यामध्ये गोव्याची साध्वी सतीश सैल, महाराष्ट्राची राजनंदिनी पवार आणि जम्मू काश्मीरची श्री अद्वैता यांचा समावेश होता. या तिघींनी कठीण प्रश्नोत्तर फेरीत आत्मविश्वास, बुद्धिमत्ता आणि शांत स्वभावाने लक्ष वेधलं. तसेच ग्लॅमर आणि पारंपरिक सौंदर्याचा सुंदर मिलाफ असलेल्या त्यांच्या आउटफिट्सनीही सर्वांची मनं जिंकली.

## रणवीर-दीपिका पुन्हा होणार आई-बाबा

बॉलिवूड कपल रणवीर सिंग आणि दीपिका पदुकोण दुसऱ्यांदा आई-बाबा होणार आहेत. दीपिका पदुकोणने एका गोड फोटोद्वारे दुसऱ्यांदा गरोदर असल्याची गुड न्यूज दिली आहे. मुलगी दुआला जन्म दिल्यानंतर दोन वर्षांनी दीपिका पदुकोण पुन्हा गरोदर आहे. दीपिकाने तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर एक फोटो शेअर केला आहे, ज्यामध्ये रणवीर सिंग त्यांची मुलगी दुआला मांडीवर घेऊन बसलेला दिसत आहे. फोटोमध्ये रणवीरचा चेहरा दिसत नाही आणि दुआचा अर्धा चेहरा झाकलेला आहे. यात चिमुकल्या दुवाच्या हातात प्रेग्नेंसी टेस्ट किट आहे. त्यावर पॉझिटिव्हच्या खुणा सुद्धा दिसत आहेत. दीपिकाने दुसऱ्यांदा गुड न्यूज शेअर करताच अनेकांकडून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. दीपिका पादुकोण आणि रणवीर सिंह यांनी 15 नोव्हेंबर 2018 मध्ये लग्न केले. त्यानंतर दीपिका पादुकोणने 8 सप्टेंबर 2024 रोजी मुलगी दुवा जन्म दिला होता. आता लग्नाच्या 8 वर्षांनी ते त्यांच्या दुसऱ्या अपत्याचे स्वागत करणार आहे. सध्या रणवीर सिंह त्याच्या 'धुरंधर 2' या सिनेमामुळे चर्चेत आहे. त्याच्या सिनेमाने बॉक्स ऑफिसवरील बरेच रेकॉर्ड मोडले आहेत. अशावेळी दीपिका कुठेच दिसली नव्हती. आज अखेर दीपिकाने तिची दुसरी प्रेग्नंसी जाहीर करत प्रमोशनला जात नसल्याचे कारण स्पष्ट केले आहे.



# वर्ल्डकपआधी BCCI चा मास्टरस्ट्रोक

## अजित आगरकर यांना निवड समिती अध्यक्षपदाची मुदतवाढ

**महाईन्यूज । मुंबई**




**भारताचे माजी क्रिकेटपटू अजित आगरकर सध्या भारतीय संघाचे मुख्य निवडकर्ते आहेत. आतापर्यंत आपल्या कार्यकाळात अजित आगरकरांनी अनेक धाडसी निर्णय घेतला आहे. त्यांचा कार्यकाळ येत्या जून महिन्यात समाप्त होणार आहे. आता बीसीसीआयने त्यांचं प्रमोशन केलं असून, अजित आगरकरांचा कार्यकाळ आणखी एका वर्षासाठ वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या २०२७ मध्ये भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेत वनडे वर्ल्डकप खेळण्यासाठी जाणार आहे. हा वर्ल्डकप लक्षात घेता, बीसीसीआयने त्यांचा कार्यकाळ आणखी एक वर्ष वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.**

अजित आगरकर यांचा कार्यकाळ जून महिन्यांपर्यंत वाढवण्यात आला आहे. तर वर्ल्डकप २०२७ स्पर्धेचे आयोजन ऑक्टोबर महिन्यात केले जाणार आहे. आगामी वर्ल्डकप स्पर्धा दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबियात खेळवली जाणार आहे. त्यामुळे अजित आगरकरांचा कार्यकाळ ऑक्टोबरपर्यंत म्हणजेच, वर्ल्डकपपर्यंत वाढवला जाऊ शकतो. पण याबाबत कुठलीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

अजित आगरकरांच्या कार्यकाळात काही धाडसी निर्णय घेण्यात आले आहेत. ज्यात विराट कोहली आणि रोहित शर्माच्या कसोटी निवृत्तीचाही समावेश आहे. विराट कोहली आणि रोहित शर्मा या दोघांनी ऑस्ट्रेलिया दौऱ्याहून परतल्यानंतर एका पाठोपाठ एक कसोटी कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती. दोघांना कसोटी क्रिकेटमधून निवृत्त होण्यासाठी भाग पाडलं गेल्याची चर्चा रंगली होती. त्यानंतर वनडे आणि कसोटी संघाचा भाग असलेल्या मोहम्मद शमीला देखील संघाबाहेरचा रस्ता दाखवण्यात आला.

## कोलकाताचा अखेर विजय!



राजस्थानला रिंकू सिंगचा झेल सोडणे महागात पडले

# चेन्नई सुपर किंग्जचा संघाला मोठा धक्का! आयुष म्हात्रे IPL मधून बाहेर

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**आयपीएल स्पर्धेत ५ वेळा जेतेपदाची ट्रॉफी उंचावणारा चेन्नई सुपर किंग्जचा संघ आयपीएल २०२६ स्पर्धेत हवी तशी कामगिरी करू शकलेला नाही. ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखाली खेळणारा चेन्नईचा संघ एक एक विजय मिळवण्यासाठी संघर्ष करताना दिसून येत आहे. एकीकडे खेळाडूंचा फॉर्म तर दुसरीकडे खेळाडूंची दुखापत, हे समीकरण चेन्नईची पाठ सोडत नाहीये. स्पर्धेला सुरुवात होण्याआधीच एमएस धोनी दुखापतग्रस्त झाला. तो आतापर्यंत एकही सामना खेळू शकलेला नाही. त्यानंतर डेवाल्ड ब्रेव्हिस दुखापतग्रस्त झाला होता. आता फॉर्ममध्ये असलेला आयुष म्हात्रे दुखापतग्रस्त झाल्याने चेन्नई सुपर किंग्जच्या टेन्शनमध्ये वाढ झाली आहे.**




शनिवारी झालेल्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्ज आणि सनरायझर्स हैदराबाद हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात आयुषने चांगली सुरुवात करून दिली होती. पण ५ व्या षटकात त्याला हॅमस्ट्रिंगचा त्रास जाणवला. त्यामुळे काही वेळ तो फलंदाजी करू शकला नाही. फिजिओ आले आणि तपासणी केल्यानंतर त्याने पुन्हा एकदा फलंदाजी सुरू केली. पण तो स्वस्तात बाद झाला. आता तो ३ आठवडे आयपीएल स्पर्धेतून बाहेर होणार असल्याची माहिती समोर येत आहे.

आयुषने गेल्या काही सामन्यांमध्ये चेन्नईला चांगली सुरुवात करून दिली होती. पंजाब किंग्ज विरुद्ध खेळताना त्याने ७३ धावांची खेळी केली होती. तर दिल्लीविरुद्ध झालेल्या सामन्यात त्याने अर्धशतकी खेळी केली होती. त्यानंतर कोलकाता नाईट रायडर्स संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात ३८ धावांची खेळी केली होती. हैदराबादविरुद्ध धावांचा पाठलाग करताना त्याने चांगली सुरुवात करून दिली होती. पण दुखापतीचा परिणाम त्याच्या फलंदाजीवर जाणवला.

### आयुष ३ आठवड्यांसाठी बाहेर..

आयुष म्हात्रे दुखापतीमुळे ३ आठवडे संघाबाहेर राहणार आहे. सध्या चेन्नईचा संघ तळाशी आहे. असं असताना आयुष म्हात्रे संघाबाहेर होणं हा चेन्नईसाठी सर्वात मोठा धक्का आहे. तो ३ आठवड्यांसाठी संघांबाहेर राहणार आहे. त्यामुळे आता तो थेट १० मे नंतर खेळताना दिसेल. चेन्नईने आतापर्यंत ६ सामने खेळले आहेत, यादरम्यान २ सामने जिंकले आहेत. तर ४ सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

। सोमवार ।
दि. 20 एप्रिल 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# नगरसेवकांनी वाचला समस्यांचा पाढा

## ‘ड’ प्रभागातील नागरी समस्यांवर उपाययोजनांसाठी आढावा बैठक संपन्न

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका ‘ड’ प्रभागातील विविध नागरी प्रश्न, मूलभूत सुविधा आणि विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी नुकतीच आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत प्रभागातील नागरिकांच्या दैनंदिन अडचणी, प्रलंबित कामे तसेच आगामी विकास आराखड्यांवर सखोल चर्चा करण्यात आली.**



ही बैठक सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीस ड प्रभाग क्षेत्रीय कार्यालयातील सर्व संबंधित विभागांचे अधिकारी, तसेच प्रभागातील सर्व नवनिर्वाचित नगरसेविका आणि नगरसेवक उपस्थित होते. नागरिकांना अधिक दर्जेदार आणि तत्पर सेवा देण्याच्या दृष्टीने प्रशासन व लोकप्रतिनिधींनी संयुक्तपणे विविध विषयांवर चर्चा केली.

बैठकीत कचरा व्यवस्थापन, नियमित पाणीपुरवठा, उद्यानांची देखभाल, रस्त्यांची दुरुस्ती, स्ट्रीट लाइट व्यवस्था, ड्रेनेज लाइन, स्ट्रॉम वॉटर लाइन तसेच नाल्यांची साफसफाई या महत्त्वाच्या विषयांवर विशेष भर देण्यात आला. अनेक भागांमध्ये नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना करण्यात आल्याचे नगरसेविका स्नेहा कलाटे यांनी सांगितले.

प्रभागातील समस्या केवळ नोंदवून न ठेवता त्या तातडीने मार्गी लावण्यासाठी ठोस पावले उचलण्याचे निर्देश प्रशांत शितोळे यांनी यावेळी दिले.

> “ या बैठकीला उपस्थित नगरसेवकांनी आपल्या प्रभागातील विविध समस्या मांडत नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी त्वरित कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. बैठकीत झालेल्या सकारात्मक चर्चेमुळे प्रभागातील कचरा, पाणी, सांडपाणी, नाले सफाई, आरोग्य, रस्ते, पथदिवे, पदपथ, अतिक्रमणे, वाहतूक कोंडी यांसारख्या अनेक प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्याचा प्रशासन प्रयत्न करील अशी आम्हास अपेक्षा आहे.
>
> – स्नेहा रणजित कलाटे, नगरसेविका, भाजप.

# सुरेल संगीत आणि भीम गीतांनी पिंपरी चिंचवड महापालिका आयोजित सामाजिक समता सप्ताह व विचार प्रबोधन पर्वाची सांगता!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांची जागर करणाऱ्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित सामाजिक समता सप्ताह व विचार प्रबोधन पर्व २०२६ चा समारोप सुरेल संगीत, मधुर स्वर आणि भीम गीतांच्या संगमात उत्साहपूर्ण वातावरणात झाला.**




या पर्वाच्या समारोप प्रसंगी प्रसिद्ध गायक अभिजित कोसंबी यांनी स्वरांच्या नादमधुर लहरींनी वातावरण भारावून टाकत, भीम गीतांच्या सादरीकरणातून समतेचा संदेश देत उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली.

या विचार प्रबोधन पर्वामध्ये सप्ताहभर विविध प्रबोधनात्मक, सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये महात्मा जोतीराव फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची जागरूकता निर्माण करण्यात आली. तर या सप्ताहाच्या समारोपाच्या दिवशी प्रसिद्ध गायकांचे गीत गायन ठेवण्यात आले होते.

समारोपाच्या दिवशी आयोजित गीत गायन कार्यक्रमाला विशेष प्रतिसाद मिळाला. अभिजित कोसंबी यांच्यासह मेघानंद जाधव आणि मधुकर कदम यांनीही आपल्या सादरीकरणातून उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या गायनातून सामाजिक समतेचा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यात आला.

या संपूर्ण उपक्रमाद्वारे समाजात समता, बंधुता आणि एकात्मतेची मूल्ये अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# स्थानिकांना नोकरीत प्राधान्य देण्याच्या प्रस्तावाला विधी समितीची मंजुरी

## सर्वसाधारण सभेच्या मान्यचेची प्रतिक्षा : राष्ट्रवादीचे सदस्य शेखर चिंचवडे व तुषार सहाणे यांचा प्रस्ताव

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील सरळ सेवा भरती प्रक्रियेत स्थानिक उमेदवारांना अधिक संधी मिळावी या मागणीला आता प्रशासनिक पातळीवर महत्त्वाची गती मिळाली आहे. रिक्त पदे मोठ्या प्रमाणावर असतानाही भरती प्रक्रिया अनेकदा प्रलंबित राहिल्याच्या पार्श्वभूमीवर, स्थानिकांना प्राधान्य देणारा प्रस्ताव विधी समितीमध्ये मंजूर करण्यात आला आहे.**




पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियमांमध्ये बदल करून सरळ सेवेतील भरतीत स्थानिक नागरिकांसाठी टक्केवारीनुसार आरक्षण निश्चित करण्याची शिफारस या प्रस्तावातून करण्यात आली आहे.

हा प्रस्ताव विधी समितीचे सदस्य तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक शेखर चिंचवडे आणि तुषार सहाणे यांनी समितीसमोर मांडला होता. शहरातील बेरोजगारी, स्थानिक तरुणांना रोजगारात कमी मिळणाऱ्या संधी आणि मोठ्या प्रमाणातील रिक्त पदे या मुद्द्यांवर आधारित हा प्रस्ताव तयार करण्यात आला होता.

या प्रस्तावावर विधी समितीमध्ये सविस्तर चर्चा झाली. समितीच्या सभापती सुजाता बोराटे यांनी या प्रस्तावाला हिरवा कंदिल दाखवत मंजुरी दिली आहे. त्यांच्या मंजुरीनंतर आता हा प्रस्ताव अंतिम निर्णयासाठी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आला आहे.

सरळ सेवा भरतीत स्थानिकांना प्राधान्य मिळाल्यास शहरातील हजारो बेरोजगार तरुणांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः ड/४ आणि क/३ संवर्गातील पदांमध्ये मोठ्या प्रमाणात स्थानिकांना संधी मिळू शकते, असा अंदाज आहे. यावर दि. २० एप्रिल २०२६ रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत शिक्कामोर्तब होणार आहे.

### प्रस्तावातील महत्त्वाच्या तरतुदी

या प्रस्तावानुसार विविध संवर्गांमध्ये स्थानिक उमेदवारांसाठी खालीलप्रमाणे प्राधान्य देण्याची शिफारस करण्यात आली आहे: अ/१ संवर्ग – प्रचलित शासन व मनपा नियमांनुसार भरती, ब/२ संवर्ग – ५० टक्के स्थानिक उमेदवार, क/३ संवर्ग – ८० टक्के स्थानिक उमेदवार आणि ड/४ संवर्ग – १०० टक्के स्थानिक उमेदवार अशा या बदलांसाठी महापालिका सेवाशर्ती नियमांमध्ये सुधारणा करून राज्य शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्याची शिफारसही करण्यात आली आहे.



"पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि स्थानिकांना न्याय देणारी असावी, यासाठी आम्ही सकारात्मक भूमिका घेतली आहे. स्थानिक तरुणांना अधिकाधिक रोजगाराच्या संधी मिळाव्यात, हा या प्रस्तावामागचा मुख्य उद्देश आहे. अंतिम निर्णय सर्वसाधारण सभेत होणार असून, तो शहराच्या हिताचा आणि संतुलित असेल याची आम्हाला खात्री आहे.

**- सुजाता बोराटे, सभापती विधी समिती, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

---

# SPG इंटरनॅशनल पब्लिक स्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के; गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**येथील नामांकित 'SPG इंटरनॅशनल पब्लिक स्कूल'ने दरवर्षीप्रमाणे यंदाही आपल्या शैक्षणिक उत्कृष्टतेची परंपरा कायम राखली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या CBSE इयत्ता दहावीच्या परीक्षेत शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून, ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवणाऱ्या २४ विद्यार्थ्यांचा विशेष गौरव सोहळा शाळेच्या प्रांगणात उत्साहात पार पडला.**




कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. या प्रसंगी पांडुरंग नाना गवळी , सुनिता माई गवळी, स्वप्नील गवळी, कोमल गवळी, संकल्प गवळी आणि डॉ जयश्री सुरवसे*यांची प्रमुख उपस्थिती होती. शाळेचे प्राचार्य डॉ. प्रवीण गायकवाड यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत केले.

एकूण २४ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी बोलताना श्री. स्वप्नील गवळी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत म्हटले की, "दहावीचा निकाल हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा असतो. SPG इंटरनॅशनल पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश केवळ त्यांचेच नव्हे, तर त्यांच्या पालकांच्या विश्वासाचे आणि शिक्षकांच्याO सातत्यपूर्ण परिश्रमाचे फळ आहे. शाळेने दिलेले दर्जेदार शिक्षण आणि शिस्त यामुळेच ही उज्ज्वल यशाची परंपरा कायम आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीस माझ्या मनापासून शुभेच्छा."

शाळेचे प्राचार्य डॉ. प्रवीण गायकवाड यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल अभिमान व्यक्त करतानाच, या यशात शिक्षक आणि पालकांचा मोलाचा वाटा असल्याचे सांगितले. डॉ. जयश्री सुरवसे यांनी विद्यार्थ्यांना पुढील करिअरच्या निवडीबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शाळेने दिलेल्या संस्कारांप्रति कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन श्रीमती सोनल तांबे यांनी केले, तर आभार प्रदर्शनाने व समूह छायाचित्राने कार्यक्रमाची सांगता झाली. या सोहळ्यामुळे भोसरी परिसरात शाळेच्या शैक्षणिक यशाचे कौतुक होत आहे.

"विद्यार्थ्यांनी आयुष्यात मोठी स्वप्ने पहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करावेत, शाळा सदैव तुमच्या पाठीशी आहे."

**— डॉ. प्रवीण गायकवाड, प्राचार्य.**

### यशाचे मानकरी

या परीक्षेत शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. यात प्रामुख्याने :

| | |
|---|---|
| स्नेहा देओकर : | ९६.६% (प्रथम क्रमांक) |
| योगिनी दुकारे : | ९६% (द्वितीय क्रमांक) |
| अतिक शेख : | ९६% (तृतीय क्रमांक) |
| शिवराज तापकीर : | ९५.६% (चतुर्थ क्रमांक) |
| श्रेया बॅनर्जी : | ९५.४% (पाचवा क्रमांक) |


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046